रसिकाश्रय

# दिव्यांग व्यक्तींच्या आर्थिक स्थितीवर अभ्यास

Parwa Road, Ghatanji Dist Yavatmal - 445301
Maharashtra (INDIA)

Subscribe our social media

## 1. प्रस्तावना

समाजातील प्रत्येक व्यक्तीला समान संधी, हक्क, आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. परंतु, दिव्यांग व्यक्तींना त्यांच्या दैनंदिन जीवनात अनेक प्रकारच्या अडथळ्यांचा सामना करावा लागतो. शारीरिक अडथळे, शिक्षण आणि रोजगाराच्या संधींची कमतरता, सामाजिक अपप्रवृत्ती, आणि समर्पक तांत्रिक सुविधांचा अभाव यामुळे त्यांच्या आत्मसामर्थ्यावर परिणाम होतो.
दिव्यांग व्यक्तींसाठी सक्षम समाज निर्माण करण्यासाठी त्यांची गरज, समस्या आणि उपलब्ध सेवांची प्रभावीता यांचा सखोल मिळवण्यासाठी त्यांना येणाऱ्या अडथळ्यांचा अभ्यास आणि उपाययोजना. समाजात त्यांना समानता, आदर, आणि संधी देण्यासाठी काय उपाययोजना आवश्यक आहेत?
अभ्यासाचा उद्देश दिव्यांग व्यक्तींना केवळ सहानुभूती नव्हे तर त्यांच्या जीवनशैलीत सुधारणा घडवून आणण्यासाठी परिणामकारक धोरणे तयार करणे हा आहे.
या अहवालाद्वारे मिळालेल्या निष्कर्षांमुळे दिव्यांग व्यक्तींसाठी त्यांच्या गरजांवर आधारित उपयुक्त कार्यक्रम आखता येतील. यामुळे त्यांना अधिक सशक्त, स्वावलंबी, आणि समावेशक समाजाचा भाग बनवता येईल.

## 2. संशोधन पद्धती :

- **नमुना आकार :** सर्वेक्षणासाठी यवतमाळ जिल्ह्यातील घाटंजी तालुक्यातील 36 गावातील 178 दिव्यांग व्यक्तींना निवडले गेले. यामध्ये 99 पुरुष आणि 79 महिलांचा समावेश होता. वयाची श्रेणी 0 ते 60 वर्षांवरील दिव्यांग व्यक्ती होती.
- **माहिती संकलनाची पद्धत :** डेटा संकलनासाठी प्रश्नावली आणि वैयक्तिक मुलाखतींचा वापर करण्यात आला. सर्वेक्षणात आर्थिक स्थिती विषयी प्रश्न विचारण्यात आले.
- **माहितीचे विश्लेषण :** संकलित माहिती Microsoft Excel मध्ये टाकून सांख्यिकीय विश्लेषण करण्यात आले. परिणाम ग्राफ्स आणि तक्त्यांच्या स्वरूपात खालीलप्रमाणे सादर करण्यात आले आहे.

## 3. गाव निहाय दिव्यांग व्यक्तिंची संख्या:

| अनु. क्र. | गावाचे नाव | दिव्यांगांची संख्या | अनु. क्र. | गावाचे नाव | दिव्यांगांची संख्या | अनु. क्र. | गावाचे नाव | दिव्यांगांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | आंबेझरी | 3 | 13 | कालेश्वर | 2 | 25 | रत्नापूर | 1 |
| 2 | भांबोरा | 3 | 14 | कवठा | 1 | 26 | सगदा | 3 |
| 3 | बोदाडी | 4 | 15 | कवठा खुर्द | 2 | 27 | सावंगी | 36 |
| 4 | चांदापूर | 1 | 16 | कोंडजई | 3 | 28 | सायतखर्डा | 1 |
| 5 | चिखलवर्धा | 21 | 17 | मंगी | 8 | 29 | शरद | 3 |
| 6 | चोरकुंड | 2 | 18 | मांजरी | 1 | 30 | शिवनी | 1 |
| 7 | डांगरगाव | 2 | 19 | मेजदा | 4 | 31 | सोनखास | 5 |
| 8 | दत्तापूर | 1 | 20 | नागेझरी | 1 | 32 | ताडसावळी | 9 |
| 9 | गणेरी | 4 | 21 | पिंपरी | 3 | 33 | तरोडा | 6 |
| 10 | घोटी | 1 | 22 | राजेगाव | 3 | 34 | ठाणेगाव | 6 |
| 11 | इंझाळा | 10 | 23 | राजूरवाडी | 2 | 35 | टिपेश्वर | 4 |
| 12 | जांब | 9 | 24 | रासा | 1 | 36 | झटाळा | 11 |
| | | | | | | | **एकूण** | **178** |

**विश्लेषण**

- **सावंगी (३६), चिखलवर्धा (२१) आणि झाटाळा (११) यांसारख्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात दिव्यांग व्यक्ती असल्याने दिसून आले आहे. तेथील आरोग्य, पुनर्वसन आणि आर्थिक सहाय्य यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे.**

- मध्यम गटातील गावे (५-८) मध्ये रोजगार व स्वावलंबनाच्या संधी वाढविण्यासाठी प्रयत्न करावेत.
- एक-दोन दिव्यांग व्यक्ती असलेल्या गावांमध्ये त्यांच्या विशिष्ट गरजांनुसार सहाय्य दिल्यास त्यांना अधिक चांगली मदत मिळू शकेल.
- मोठ्या संख्येच्या गावांमध्ये दिव्यांगांसाठी शासकीय योजना आणि सुविधा पोहोचविण्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्याची गरज आहे.

### 4. दिव्यांगाच्या प्रकारानुसार वर्गीकरण


| Sl. No. | Type of Disability | 0 – 5 | | 6 – 14 | | 15 - 18 | | 19 - 40 | | 41 - 59 | | 60 + | | Total | | Grand Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | M | F | |
| 1 | अल्प दृष्टी (Low Vision) | 0 | 0 | 1 | 0 | | | 3 | 2 | 1 | 0 | 0 | 1 | 5 | 3 | 8 |
| 2 | अस्थिव्यंग (Locomotor Disability) | 2 | 1 | 4 | 2 | 2 | 0 | 17 | 14 | 18 | 10 | 9 | 9 | 52 | 36 | 88 |
| 3 | कर्णबधिरत्व (Deafness) | 0 | 0 | 2 | 0 | 1 | 0 | 3 | 0 | 4 | 4 | 2 | 1 | 12 | 5 | 17 |
| 4 | कुष्टरोग ( Leprosy Cured Persons) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 0 | 1 |
| 5 | पुर्णत: अंध ( Blindness) | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 2 | 0 | 2 | 1 | 4 | 4 | 8 |
| 6 | बहुविकलांग (Multiple Disabilities) | 0 | 0 | 2 | 2 | 0 | 0 | 2 | 6 | 0 | 0 | 2 | 0 | 6 | 8 | 14 |
| 7 | बौध्दिक अक्षमता (Intellectual Disability ) | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 1 | 2 | 2 | 0 | 2 | 1 | 0 | 5 | 6 | 11 |
| 8 | मज्जासंस्थेचा तीव्र आजार (Chronic Neurological Conditions) | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 2 |
| 9 | मानसिक आजार ( Mental Illness) | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 3 | 5 | 1 | 3 | 2 | 0 | 7 | 9 | 16 |
| 10 | वाचा व भाषा दोष ( Speech and Language Disability) | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 2 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 3 | 0 | 3 |
| 11 | शारिरीक वाढ खुंटणे (कमी उंची) Dwarfism | 0 | 0 | 0 | 0 | 0 | | 1 | 4 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 5 | 6 |
| 12 | स्नायुची विकृती (Multiple Sclerosis) | 0 | 0 | 1 | 0 | 0 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 0 | 3 | 1 | 4 |
| | Total: | 2 | 1 | 13 | 7 | 4 | 2 | 34 | 36 | 27 | 20 | 19 | 13 | 99 | 79 | 178 |
| | Total Male | 19 | | | | | | 80 | | | | | | | | |
| | Total Female | 10 | | | | | | 69 | | | | | | | | |

### विश्लेषण

- पुरुष दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण 55.61 % आणि स्त्रियांचे प्रमाण 44.38 % आहे. याचा अर्थ पुरुष दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण स्त्रियांच्या तुलनेत अधिक आहे.
- काही दिव्यांग प्रकारांमध्ये स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे, जसे की बहुविकलांग (Multiple Disabilities) आणि मानसिक आजार (Mental Illness).
- अस्थिव्यंग (Locomotor Disability) असलेल्या व्यक्तींचे प्रमाण 49.43 % आहे. हे इतर दिव्यांगच्या तुलनेत सर्वाधिक आहे.
- 19-40 वयोगटातील दिव्यांग व्यक्तींची संख्या सर्वाधिक 49.32 % आहे, याचा अर्थ कार्यक्षम वयोगटातील लोकांनामध्ये जास्त दिव्यांगत्व आहे.
- लहान मुलांमध्ये (0-5) दिव्यांगत्वाचे प्रमाण कमी आहे, परंतु 6-14 वयोगटात वाढ दिसून येते, यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे.

5. **दिव्यांग व्यक्तीकडे असणाऱ्या दिव्यांग प्रमाणपत्राची स्थिती:**

**विश्लेषण**




- 63.5% दिव्यांग व्यक्तींकडे दिव्यांगाचे प्रमाणपत्र आहे. तर **36.5% दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्र नाही,** त्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळू शकत नाही.
- दिव्यांग प्रमाणपत्राशिवाय आरोग्य सेवा, शिष्यवृत्ती, अनुदाने, रोजगार व आर्थिक मदतीसाठी पात्र ठरता येत नाही.
- काही व्यक्तींना प्रमाणपत्र काढण्याची प्रक्रिया माहिती नसल्याने किंवा अडचणींमुळे त्यांनी ते काढले नसेल.

6. **दिव्यांग व्यक्तीकडे असणाऱ्या बसपासची स्थिती:**





**विश्लेषण**

- 37.6% दिव्यांग व्यक्तींकडे बसपास आहे. तर **62.4% दिव्यांग व्यक्तींकडे बसपास नाही.** याचा अर्थ त्यांना सार्वजनिक वाहतुकीच्या सवलतींचा लाभ मिळत नाही.
- प्रवास खर्च जास्त असल्याने रोजगार, शिक्षण, आरोग्यसेवा यांसाठी जाणे कठीण होते.


7. **दिव्यांग व्यक्तीकडे असणाऱ्या UDID कार्डची स्थिती:**

**विश्लेषण**




- 36.5% दिव्यांग व्यक्तींकडे UDID कार्ड आहे. तर **63.5% दिव्यांग व्यक्तींकडे UDID कार्ड नाही.** याचा अर्थ त्यांना शासकीय योजनांचा पूर्ण लाभ मिळत नाही.
- UDID (Unique Disability Identity) कार्ड हे राष्ट्रीय स्तरावर मान्यताप्राप्त ओळखपत्र आहे, जे दिव्यांग व्यक्तींसाठी विविध सुविधा आणि सवलती मिळवण्यासाठी महत्त्वाचे आहे.
- कार्ड नोंदणी प्रक्रिया जटिल असणे, माहितीचा अभाव असणे, किंवा अर्ज करण्यासाठी आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नसणे यामुळे नोंदणीचे प्रमाण कमी असू शकते.


8. **दिव्यांग कुटुंबाकडे असणाऱ्या रेशन कार्डची स्थिती:**




- BPL कुटुंबांची संख्या सर्वाधिक (44.9%) असल्याने बहुतांश दिव्यांग कुटुंबे आर्थिकदृष्ट्या दुर्बल आहेत.

- 17.4% कुटुंबांकडे अंत्योदय कार्ड आहे, म्हणजेच हे कुटुंब अत्यंत गरीब व वंचित गटात येतात.
- 36.5% कुटुंबे APL गटात येतात, म्हणजेच त्यांची आर्थिक परिस्थिती तुलनेने थोडीशी सधन आहे.
- **1.1% कुटुंबांकडे कोणतेही रेशनकार्ड नाही, त्यामुळे त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही.**


**9. दिव्यांग व्यक्तीच्या नावाने असणाऱ्या बँक खात्याची स्थिती:**





**विश्लेषण**

- मोठ्या प्रमाणात (90%) दिव्यांग व्यक्तींनी बँकिंग प्रणालीचा स्वीकार केलेला आहे, ही सकारात्मक बाब आहे.
- **मात्र 10% व्यक्ती अजूनही बँकेच्या सुविधांपासून वंचित आहेत. यामध्ये शिक्षणाचा अभाव, बँकिंग प्रक्रियेतील अडचणी किंवा ओळखपत्र नसणे यासारखी कारणे असू शकतात.**
- अशा व्यक्तींना बँक खाती उघडण्यासाठी मदत करणे गरजेचे आहे.

**10. 19 ते 60 वर्षावरील  दिव्यांग व्यक्तींनी रोजगारविषयक प्रशिक्षण घेण्याची स्थिती:**




**विश्लेषण**

- **19 ते 60 वर्षावरील  दिव्यांग व्यक्तींची संख्या 169 आहे. त्यापैकी फक्त 3% व्यक्तींनी रोजगार प्रशिक्षण घेतले आहे, तर 97% व्यक्ती अजूनही अशा प्रशिक्षणापासून दूर आहेत.**
- बहुसंख्य दिव्यांग व्यक्तींनी रोजगार प्रशिक्षण घेतलेले नाही, त्यामुळे त्यांना स्वावलंबन आणि रोजगाराच्या संधी मिळणे कठीण आहे.

**रोजगार प्रशिक्षणाच्या अभावाची कारणे आणि परिणाम:**

- अनेक दिव्यांग व्यक्तींना अशा योजना किंवा प्रशिक्षण कार्यक्रमांविषयी माहिती नाही.
- गावांमध्ये किंवा ग्रामीण भागात अशा प्रशिक्षण  केंद्रांची संख्या कमी आहे.
- काही व्यक्तींना त्यांच्या दिव्यांगत्वामुळे प्रशिक्षण घेणे अवघड जाते.
- प्रशिक्षणा अभावी बहुतांश दिव्यांग व्यक्ती स्वयंनिर्भर होऊ शकत नाहीत आणि त्यांना रोजगाराच्या संधी मिळत नाहीत.

**उपाययोजना:**

- दिव्यांगांसाठी विशेष रोजगार प्रशिक्षण केंद्र सुरू करणे.
- शासकीय योजनांची माहिती व त्याचा प्रचार वाढवणे.
- ऑनलाइन आणि ऑफलाइन प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध करून देणे.
- स्वयंरोजगार आणि लघुउद्योग यासाठी आर्थिक मदत आणि मार्गदर्शन करणे.

**11. दिव्यांग व्यक्तीच्या उपजीविकेचे साधन:**


खालील  तक्त्यात दिव्यांग व्यक्तींची उपजीविकेची साधने आणि वयगटानुसार त्यांचे वितरण दर्शविले आहे. हे विश्लेषण वेगवेगळ्या वयगटातील पुरुष आणि महिलांच्या रोजगार स्थितीवर आधारित आहे.

| उपजीविकेचे साधन | 19 - 40 | | 41 - 59 | | 60+ | | एकूण | | Grand Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | पुरुष | महिला | |
| आशा सेविका | | 1 | | | | | 0 | 1 | **1** |
| कंपनीत काम करतो. | 1 | | | | | | 1 | 0 | **1** |
| कपडे शिवतात. | | 1 | 1 | | | | 1 | 1 | **2** |
| काहीच नाही | 11 | 24 | 9 | 10 | 14 | 8 | 34 | 42 | **76** |
| गवंडी काम | 1 | | | | | | 1 | 0 | **1** |
| ग्रामपंचायत कर्मचारी | 1 | | 1 | | | | 2 | 0 | **2** |
| झेरॉक्स चे दुकान | 1 | | | | | | 1 | 0 | **1** |
| पानठेला आहे. | 1 | | | | | | 1 | 0 | **1** |
| भीक मागते | | 1 | | | | | 0 | 1 | **1** |
| मजूरी | 11 | 6 | 12 | 10 | 4 | 5 | 27 | 21 | **48** |
| लोकांची धुणभंडी करतात. | 1 | | | | | | 1 | 0 | **1** |
| शिक्षण सुरु आहे. | 4 | 1 | | | | | 4 | 1 | **5** |
| शिवण क्लास | | 1 | | | | | 0 | 1 | **1** |
| शेती | 2 | 1 | 3 | | 1 | | 6 | 1 | **7** |
| हॉटेलवर काम करतात. | | | 1 | | | | 1 | 0 | **1** |
| **Grand Total** | **34** | **36** | **27** | **20** | **19** | **13** | **80** | **69** | **149** |

**विश्लेषण**

- **76 (51%) दिव्यांग लोक बेरोजगार आहेत. यामध्ये पुरुष 34 (44.7%) आणि महिला 42 (55.3%) आहेत.**
- मजुरी करणाऱ्या दिव्यांगाचे प्रमाण 48 (32.2%) आहे. यामध्ये 27 (56.25%) पुरुष आणि 21 (43.75%) महिला आहेत.
- शेती करणाऱ्या दिव्यांग व्यक्तींचे प्रमाण 7 (4.7%) आहे. त्यात 6 पुरुष आणि 1 महिला आहे.
- लघु व्यवसाय करणाऱ्या दिव्यांग व्यक्तीचे प्रमाण 5 (3.35%) आहे. यामध्ये झेरॉक्स, पानठेला, शिवणकाम इत्यादीचा समवेश आहे.

**12. दिव्यांग व्यक्तीच्या कुटुंबात असणारी शेती:**





**विश्लेषण**


- शेती असलेल्या कुटुंबांची संख्या – 178 पैकी 64 कुटुंबांकडे शेती आहे, म्हणजे 36% कुटुंबांकडे स्वतःची शेती आहे.
- शेती नसलेल्या कुटुंबांची संख्या – 114 कुटुंबांकडे शेती नाही, म्हणजे 64% कुटुंब शेतीवर अवलंबून नाहीत.
- आजीविकेवर परिणाम – शेती नसलेल्या अधिकाधिक कुटुंबांना मजुरी, लहान व्यवसाय, किंवा अन्य नोकऱ्यांवर अवलंबून राहावे लागते.
- शेती असलेल्या कुटुंबांना मदतीची गरज – शेती करणाऱ्या कुटुंबांसाठी आधुनिक तंत्रज्ञान, सिंचन सुविधा, आणि आर्थिक सहाय्याची गरज असू शकते.


**विश्लेषण**

- 79.7% दिव्यांग व्यक्तीच्या कुटुंबाकडे 1 ते 5 एकर शेती आहे.
- 14% दिव्यांग व्यक्तीच्या कुटुंबाकडे 6 ते 10 एकर शेती आहे.
- 6.3% दिव्यांग व्यक्तीच्या कुटुंबाकडे 11 ते 15 एकर शेती आहे.




**13. जनावरे असलेल्या दिव्यांग कुटुंबांची स्थिती:**





**विश्लेषण**

- **178 पैकी 40 कुटुंबांकडे (22.5%) जनावरे आहेत, म्हणजेच 77.5% कुटुंबांकडे कोणतीही जनावरे नाहीत. हे दर्शवते की बहुतांश दिव्यांग कुटुंबांकडे पशुपालन हा आर्थिक उत्पन्नाचा स्रोत नाही.**

**14. व्यवसाय सुरु करण्याची इच्छा असणाऱ्या दिव्यांग व्यक्तींची स्थिती:**

**विश्लेषण**

- **बहुसंख्य दिव्यांग व्यक्ती (73%) व्यवसाय सुरू करण्यास इच्छुक आहेत, याचा अर्थ त्यांना आर्थिक स्वावलंबन मिळवायचे आहे.**
- **मात्र, 27% व्यक्तींना व्यवसायाची इच्छा नाही, त्यामागे भांडवलाचा अभाव, कौशल्य प्रशिक्षणाची कमतरता किंवा इतर अडचणी असू शकतात.**




## सारांश :

**दिव्यांग व्यक्तींच्या रोजगार, आर्थिक स्थिती आणि शासकीय योजनांचा लाभ यासंदर्भात व्यापक सुधारणेची आवश्यकता आहे. अनेक दिव्यांग व्यक्ती बेरोजगार आहेत किंवा मजुरीसारख्या अस्थिर उत्पन्नाच्या स्रोतांवर अवलंबून आहेत. यामुळे त्यांचे आर्थिक सशक्तीकरण कमी होते.**

**शासकीय योजनांची अंमलबजावणी अद्याप अपुरी असल्याचे स्पष्ट दिसून येते. दिव्यांगत्व प्रमाणपत्र, UDID कार्ड, बस पास आणि इतर सुविधांचा लाभ घेणाऱ्यांची संख्या मर्यादित आहे. त्यामुळे जागरूकता आणि मदतीची गरज भासते.**

**शेती आणि पशुपालन करणाऱ्या कुटुंबांची संख्या तुलनेने कमी असून, व्यवसाय सुरू करण्याची इच्छा असलेल्या 130 जणांना आर्थिक आणि कौशल्यविकासाच्या संधी मिळाल्यास त्यांचे जीवनमान सुधारू शकते.**

**दिव्यांग व्यक्तींच्या आर्थिक स्वावलंबनासाठी कौशल्यविकास, स्वयंरोजगार, शासकीय योजना आणि सामाजिक सहाय्य यांचे समन्वय आवश्यक आहे. योग्य धोरणे राबवल्यास त्यांचे जीवनमान उंचावता येईल आणि त्यांना सशक्त व आत्मनिर्भर बनवता येईल.**

## शिफारसी :

1. सावंगी, चिखलवर्धा आणि झटाळा या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात दिव्यांग व्यक्ती असल्याने दिसून आले आहे. तेथील आरोग्य, पुनर्वसन आणि आर्थिक सहाय्य यावर विशेष लक्ष देण्याची गरज आहे.
2. शासकीय सुविधा व मदतीसाठी प्रमाणपत्र महत्त्वाचे आहे.त्याकरिता दिव्यांग व्यक्तींना प्रमाणपत्र मिळवण्याच्या प्रक्रियेत सहाय्य करणे आवश्यक आहे.
3. बस पास काढण्यासाठी स्थानिक स्तरावर जनजागृती करण्याची गरज आहे.
4. दिव्यांग व्यक्तींना सरकारी सवलती, आरोग्य सेवा, शिक्षण आणि रोजगार योजनांचा लाभ मिळवणे करिता 100% दिव्यांग व्यक्तींना UDID कार्ड उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक प्रयत्न आवश्यक आहेत.
5. दिव्यांगांसाठी विशेष रोजगार प्रशिक्षण केंद्र सुरू करून, शासकीय योजनांची माहिती व प्रचार वाढवणे, तसेच स्वयंरोजगार व लघुउद्योगासाठी आर्थिक मदत व मार्गदर्शन करणे आवश्यक आहे.
6. अधिकांश दिव्यांग कुटुंबे आर्थिक दृष्ट्या दुर्बल असून, त्यांना शासनाच्या विशेष योजनांची मदत आवश्यक आहे. त्याकरिता स्वयंरोजगार, आर्थिक मदत आणि कौशल्यविकास प्रशिक्षणाद्वारे या कुटुंबांचे आर्थिक सशक्तीकरण करण्याची गरज आहे.
7. बेरोजगारी मोठ्या प्रमाणावर आहे (51%), त्यामुळे दिव्यांगांसाठी रोजगार प्रशिक्षण, स्वयंरोजगार, व लघुउद्योग संधी वाढवण्याची गरज आहे.
8. मजुरी करणाऱ्यांची संख्या जास्त आहे (32%), याचा अर्थ स्थिर आणि कौशल्याधारित नोकऱ्या मिळण्यास मर्यादा आहेत.
9. स्वयंरोजगार करणाऱ्यांची संख्या खूपच कमी आहे (4.7%), त्यामुळे लघुउद्योग, कर्ज योजना आणि सरकारी अनुदान यांचा प्रचार करणे गरजेचे आहे.
10. महिलांची बेरोजगारी पुरुषांपेक्षा जास्त आहे, त्यामुळे विशेषतः महिलांसाठी कौशल्यविकास व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याची गरज आहे.
11. 100% वित्तीय समावेशन साध्य करणे आवश्यक आहे, जेणेकरून सर्व दिव्यांग व्यक्तींना बँकिंग सेवा आणि सरकारी लाभ सहज मिळू शकतील.
12. दिव्यांग व्यक्तींच्या 64% कुटुंबांकडे शेती नाही, त्यामुळे त्यांच्यासाठी रोजगार आणि आर्थिक मदतीच्या संधी निर्माण करणे गरजेचे आहे. शेती असलेल्या कुटुंबांना सुधारित शेती तंत्रज्ञान व आर्थिक मदत पुरवणे उपयुक्त ठरू शकते.
13. शेती असणाऱ्या कुटुंबामध्ये लघुउद्योग किंवा पूरक व्यवसायासाठी मदत करता येईल यामुळे दिव्यांग व्यक्तींच्या कुटुंबांचे जीवनमान सुधारण्यास मदत होऊ शकते.
14. दिव्यांग व्यक्तींच्या बहुतांश कुटुंबांकडे पशुपालन नाही. यासाठी योग्य धोरणे राबवली, तर दिव्यांग कुटुंबांसाठी पशुपालन हा चांगला आजीविकेचा पर्याय ठरू शकतो.
15. व्यवसाय करू इच्छिणाऱ्या दिव्यांग व्यक्तींना प्रोत्साहन आणि सहाय्य केल्यास त्यांचे आर्थिक स्वावलंबन वाढू शकते.
16. व्यवसाय नको असलेल्या व्यक्तींना इतर रोजगार किंवा कौशल्य वाढविण्याच्या संधी शोधण्यासाठी मदत करावी.
17. शासकीय आणि खाजगी स्तरावरून विशेष योजना, निधी आणि मार्गदर्शन उपक्रम सुरू करून दिव्यांग व्यक्तींसाठी उद्योजकतेला चालना द्यावी.
18. दिव्यांग व्यक्तींच्या आत्मनिर्भरतेसाठी आणि आर्थिक स्थिरतेसाठी स्वयंरोजगार हा एक चांगला पर्याय ठरू शकतो.